जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 OCT 2025
सकाळ

# रामशेठ ठाकूर यांच्याकडून 'लोकस्मृती'ला २५ लाख

## वसतिगृहाच्या पहिल्या टप्प्यातील इमारतीचे काम पूर्ण

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाने लोकस्मृती वसतिगृह योजना अंमलात आणली असून, वसतिगृहाच्या पहिल्या टप्प्यातील इमारतीचे कामही गतीने पूर्ण केले. पुढील टप्प्यासाठी आणखी २५ लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी तथा रायगडचे माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी केली.

लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहाच्या इमारतीचे उद्‌घाटन श्री. ठाकूर यांच्या हस्ते ऑनलाईन स्वरूपात कोनशिला अनावरणाने झाले. त्यावेळी उपस्थितांशी त्यांनी संवाद साधला. ठाकूर यांनी यापूर्वी लोकस्मृती वसतिगृह योजनेसाठी २५ लाख रुपयांचा निधी प्रदान केला आहे.

ठाकूर म्हणाले, 'लोकस्मृती वसतिगृहाच्या इमारतीची ध्वनिचित्रफीत पाहूनच काम दर्जेदार पद्धतीने झाल्याचे लक्षात येते. पुढील टप्प्याचे कामही लोकांच्या दातृत्वातून सहजपणे मार्गी लागेल.'

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'समाजातील दात्यांच्या माध्यमातून लोकस्मृती वसतिगृह उभारण्याचे ठरविल्यानंतर देणगीदारांचा लाभलेला प्रतिसाद उत्साहवर्धक होता.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृह इमारतीच्या उद्‌घाटन समारंभात ऑनलाईन सहभागी झालेले माजी खासदार रामशेठ ठाकूर.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते उपस्थित देणगीदारांचा सत्कार झाला. यामध्ये डॉ. भारती पाटील, भालचंद्र जोशी, डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. गिरिजा कुलकर्णी, डॉ. चंद्रकांत लंगरे, विलो मॅथर कंपनीचे विजयानंद सोनटक्के यांचा समावेश होता. याखेरीज इमारतीचे स्ट्रक्चरल डिझाइनचे काम करणारे विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रा. महेश साळुंखे, डॉ. पुनश्री फडणीस, अभियांत्रिकी विभागाचे उपकुलसचिव रणजित यादव, रणजित पवार, बांधकाम ठेकेदार युवराज गोंजारी, बांधकाम ठेकेदार धनंजय मुळीक, विद्युत ठेकेदार अमोल इलेक्ट्रिकल्स् यांचाही सत्कार केला. बंगळूरचे आर्किटेक्ट कारेकर अँड असोसिएट्स यांनी इमारतीचे आर्किटेक्चरल काम पूर्णतः मोफत केल्याबद्दल त्यांचाही गौरवपूर्ण उल्लेख केला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. अजित कोळेकर आदींसह स्कूल ऑफ इंजिनिअरिंगचे शिक्षक, अभियांत्रिकी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. डॉ. वैशाली सावंत यांनी स्वागत केले, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 OCT 2025
सकाळ

# माजी विद्यार्थ्याची बांधीलकी; आणखी २५ लाखांची वसतिगृहासाठी देणगी...

## रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वसतिगृहाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क



लोकस्मृती वसतिगृह इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी भालचंद्र जोशी, विजयानंद सोनटक्के, डॉ. भारती पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक-सामाजिक जाणिवेच्या भावनेतून लोकस्मृती वसतिगृह योजना अमलात आणली असून, वसतिगृहाच्या पहिल्या टप्प्यातील इमारतीचे दर्जेदार कामही गतीने पूर्ण केले. या बांधीलकीच्या भावनेतूनच उपक्रमाच्या पुढील टप्प्यासाठी आणखी २५ लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी तथा रायगडचे माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी केली.

विद्यापीठातील लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहाच्या इमारतीचे उद्घाटन ठाकूर यांच्या हस्ते ऑनलाइन झाले. ठाकूर म्हणाले, लोकस्मृती वसतिगृहाच्या इमारतीची ध्वनिचित्रफीत पाहूनच हे काम अतिशय दर्जेदार पद्धतीने झाल्याचे लक्षात येते.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उपस्थित देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ. भारती पाटील, भालचंद्र दिगंबर जोशी, डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. चंद्रकांत लंगरे आणि विजयानंद सोनटक्के यांचा समावेश होता.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. अजित कोळेकर उपस्थित होते.

### कुलगुरूंना गहिवर...

लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहाची संकल्पना ही कुलगुरू डॉ. शिर्के यांची. या उपक्रमासाठी निधी प्रदानाची सुरुवातही त्यांनी स्वतःपासून केली. आपल्या आई शारदा यांच्या नावे देणगी दिली. वसतिगृहाला भेट दिल्यानंतर पहिल्या क्रमांकाच्या कक्षाला आईचे नाव दिल्याचे दिसून आल्यानंतर त्यांच्या आठवणींचा गहिवर कुलगुरूंच्या मनी दाटून आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 OCT 2025
सकाळ

# पूर्वसुरींनी पाहिलेल्या स्वप्नाची पूर्तता

## कुलगुरू डॉ. शिर्के : संख्याशास्त्र अधिविभागाच्या सभागृहाचे उद्‌घाटन

कोल्हापूर, ता. ४ : 'संख्याशास्त्र अधिविभागासाठी अत्याधुनिक अशा सभागृह उभारणीच्या रूपाने या विभागाच्या सर्वच पूर्वसुरींनी पाहिलेल्या स्वप्नाची पूर्तता केल्याचे समाधान वाटत आहे,' अशी कृतज्ञतेची भावना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

संख्याशास्त्र अधिविभागाच्या सभागृहाचे उद्‌घाटन झाले. यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. तत्पूर्वी, संख्याशास्त्र अधिविभागाच्या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभाग सभागृहाचे कोनशिला अनावरणाने उद्‌घाटन करताना विभागाचे विद्यार्थी. शेजारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह अधिकारी.

विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते कोनशिला अनावरण केले. कुलगुरूंसह मान्यवरांच्या हस्ते फीत सोडवून इमारतीत प्रवेश केला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'संख्याशास्त्र विषयाचे महत्त्व आज सर्वच क्षेत्रांत वाढले आहे. आजचे युग डेटाचे आहे. त्यामुळे या विषयाला प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. या विद्यार्थ्यांच्या एकत्रित व्याख्यानांसाठी एका मोठ्या सभागृहाची आवश्यकता होती. अधिविभागाच्या माजी अधिविभागप्रमुख आणि शिक्षकांनी त्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला' डॉ. सोमनाथ पवार यांनी स्वागत केले. अधिविभागप्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले.

0 5 OCT 2025

पुण्यनगरी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या 'आयडिया लॅब'साठी ५० लाखांचा सीएसआर निधी

## मेनन समूहातर्फे सामाजिक दायित्व; धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) 'आयडिया लॅब' (आयडिया डेव्हलपमेंट, इव्हॅल्युएशन अँड अॅप्लिकेशन लॅब) स्थापित करण्यासाठी येथील मेनन समूहातर्फे सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) अंतर्गत ५० लाखांच्या भरीव निधीचा धनादेश मेनन समूहाचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक सचिन मेनन यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.



**कोल्हापूर : आयडिया लॅबसाठी ५० लाखांच्या दायित्व निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना मेनन समूहाचे चेअरमन सचिन मेनन.**

सचिन मेनन म्हणाले, शिवाजी विद्यापीठ हे असे ठिकाण आहे, जिथे तरुण मने घडवली जातात. उद्योग जगतातील लोक म्हणून आम्ही व्यवसायासाठी योग्य परिसंस्था तयार करू शकतो; परंतु खरी शैक्षणिक आणि विषयानुषंगिक जडणघडण फक्त विद्यापीठच करू शकते. स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथून बाहेर पडणारे विद्यार्थी उद्योग क्षेत्राशी थेट जुळवून घेऊ शकतील, तसेच उद्योग जगतातील घडामोडींचा अचूक वेध घेऊ शकतील, या दृष्टीने आयडिया लॅब अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे. ही लॅब या भागातील सर्वाधिक गुणवत्तापूर्ण होण्यासाठी मेनन समूह सदैव विद्यापीठासोबत राहील.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, मेनन समूह आपल्या कार्यक्षेत्रात कायमच अग्रेसर राहिला आहे. लॅबच्या अॅडव्हायझरी कौन्सिलच्या माध्यमातून अत्याधुनिक सुविधा निर्माण करता येतील. या आयडिया लॅबच्या निमित्ताने मेनन समूहाचे शिवाजी विद्यापीठाशी जोडले जाणे, उद्योग क्षेत्र आणि समाज या दोहोंच्या उन्नतीमध्ये भरीव योगदान देणारे राहील.

स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी प्रास्ताविक केले. आयडिया लॅब समन्वयक डॉ. पी. डी. पाटील यांनी आयडिया लॅबच्या उद्दिष्टांची माहिती दिली. लॅबचे सहसमन्वयक डॉ. एस. बी. चव्हाण यांनी आभार मानले.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस. डी. डेळेकर, क्वॉलिटी ऑफिसर सुभाष माने, इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिलचे हर्षवर्धन पंडित उपस्थित होते. मेनन समूहातर्फे कार्यकारी संचालक शरण्या मेनन, देविका मेनन, निवेदिता मेनन, समूहाचे प्रेसिडेंट आर. डी. दीक्षित, व्हाईस प्रेसिडेंट अमित देशपांडे व मिलिंद धोपेश्वरकर, प्रमोद सूर्यवंशी, अनिल पुरोहित, योगेश देशमुख आदी अधिकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 OCT 2025
सकाळ

# कुलगुरु, प्र-कुलगुरूंचा उद्या निरोप समारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याबद्दल निरोप व सदिच्छा समारंभ सोमवारी (ता. ६) दुपारी तीन वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. त्यासाठी विद्यापीठातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, अधिकार मंडळातील सदस्य, अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 OCT 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. राज्यशास्त्र अधिविभागाच्या डॉ. नेहा वाडेकर यांनी उपस्थितांना अहिंसेची शपथ दिली. त्यानंतर प्राचार्य डॉ. विश्वास पाटील लिखित 'कस्तुरबा गांधी यांचे जीवनचरित्र' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर विद्यापीठ परिसरासह केएसबीपी पार्क, तसेच नजीकच्या राष्ट्रीय महामार्ग परिसरात 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. तानाजी चौगले आदी सहभागी झाले. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 OCT 2025
पुढारी

# 'शिलालेखात भाषेची विविध रूपे'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठातून

शिलालेख हा भाषेच्या प्रवासाचे दाखले देणारे ऐतिहासिक आणि विश्वासार्ह वारसदार आहेत. शिलालेखांमध्ये भाषेची विविध रूपे सापडतात, असे प्रतिपादन शिलालेख अभ्यासक डॉ. नीलेश शेळके यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'निमित्त आयोजित 'शिलालेखातील मराठी' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे होते. डॉ. शेळके म्हणाले, शिलालेख ही मराठी भाषेची समृद्धी आहे. शिलालेखांतून भाषेचा, राजवटींचा इतिहास ज्ञात होतो. जीर्णोद्धाराच्या नावाखाली आपण सांस्कृतिक इतिहास गाडत निघालो आहोत. अशावेळी तरुण अभ्यासकांनी शिलालेखांचे जतन-वाचन करण्यासाठी पुढे येणे नितांत गरजेचे आहे.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, पुस्तकांच्या बाहेरचे ज्ञानक्षेत्र म्हणून शिलालेख अभ्यासाकडे पाहिले पाहिजे. मराठी भाषेला विस्तारणारे क्षेत्र म्हणून संशोधकांनी याकडे वळण्याची आवश्यकता आहे. रूपाली पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 OCT 2025
पुढारी



**कोल्हापूर : अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेसाठी पात्र ठरलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.**

# अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघ पात्र

**कोल्हापूर :** इंदोर (मध्य प्रदेश) येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धेतील शनिवारच्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने मुंबईच्या डॉ. होमी भाभा विद्यापीठ संघावर विजय मिळवून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली. अत्यंत चुरशीने झालेल्या या सामन्यात मध्यंतरापर्यंत शिवाजी विद्यापीठ १४-१३ असा केवळ १ गुणाने पुढे होता. सामन्याच्या शेवटच्या पाच मिनिटांमध्ये सौरभ फगरे यांच्या चढाया व अवधूत आदित्य पवार यांनी केलेल्या पकडींच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाने हा सामना ६ गुणांनी म्हणजेच ३२-२८ असा जिंकला. संघाला डॉ. देवेंद्र बिरनाळे, डॉ. संजय पाटील, प्राचार्य डॉ. बाबासाहेब उलपे आणि अयुब कच्ची यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 OCT 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात उद्या माध्यम संवाद परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, विद्यापीठ विकास मंच, वृत्तपत्र विद्या व जनसंवाद विभाग, विश्व संवाद केंद्राच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (ता. ६) माध्यम संवाद परिषद होणार आहे. राज्याचे उच्चशिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर 'ट्रम्प, टॅरिफ आणि मीडिया' या विषयावर संवाद साधणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी हॉलमध्ये सकाळी साडेअकरा वाजता हा कार्यक्रम होईल.